महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

क्र. मासंवि/मावक/७७३

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : managerbcrrc@gmail.com
Website : www.mahadiscom.in

**दिनांक : १०.०१.२०१८**

# परिपत्रक

**विषय :** पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र. २७९७/२०१५ संदर्भात दिनांक ०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्याबाबत मार्गदर्शनपर सूचना.

**संदर्भ :** १) महाराष्ट्र शासन पत्र क्र.बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२A भाग-१/१६-ब दिनांक २९.१२.२०१७.
२) म.रा.वि.मं. प्रशासकीय परिपत्रक क्र. ४४३ दिनांक ०३.०१.२००५.
३) म.रा.वि.वि.कं.मर्या. चे प्रशासकीय परिपत्रक क्र. १०८ दिनांक १९.०५.२००७.
४) म.रा.वि.वि.कं.मर्या. चे परिपत्रक क्र. २६८७१ दिनांक ०३.११.२०१७.

-----------------

महाराष्ट्र शासनाने, शासन निर्णय क्र. बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब दिनांक २५ मे, २००४ नुसार शासन सेवेत असलेल्या मागासवर्गीय अधिकारी यांना पदोन्नतीतील आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व टप्प्यावर लागू केलेले आहे. आरक्षण कायदा-२००४ नुसार मागासवर्गीयांच्या शासकीय सेवेतील आरक्षणांच्या आदेशांचे योग्य प्रकारे अंमलबजावणी करण्यासाठी मंत्रालयीन स्तरावर वेळोवेळी शासन परिपत्रकान्वये सूचना/तरतुदी निर्गमित केल्या आहेत.

२. शासनाने पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र. २७९७/२०१५ संदर्भात दिनांक ०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्याबाबत मार्गदर्शनपर सूचना निर्गमित केल्या आहेत.

३. महाराष्ट्र शासन पत्र क्र. बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२A भाग-१/१६-ब दिनांक २ नोव्हेंबर, २०१७ अन्वये मा. सर्वोच्च न्यायालयात दिनांक १३.११.२०१७ रोजी होणा-या सुनावणीपर्यंत सर्व स्तरावरील पदोन्नती प्रक्रिया स्थगित ठेवण्याबाबत तसेच पदोन्नती संदर्भातील कोणतेही आदेश निर्गमित न करण्याबाबत मार्गदर्शनपर सूचना देण्यात आल्या होत्या.

४. आता, महाराष्ट्र शासन पत्र क्र. बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२A भाग-१/१६-ब दिनांक २९ डिसेंबर, २०१७ अन्वये पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्याबाबत मार्गदर्शनपर सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार तुर्तास पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाजेष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्यात यावीत. अशी कार्यवाही करतांना सेवाजेष्ठता यादीमधील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देण्यापुर्वी ते, दि. २५.५.२००४ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळून सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत, याची खात्री करावी.

५. शासनाच्या सदर पत्रातील सूचना/तरतुदीचे काटेकोरपणे पालन होण्यासाठी सर्व संबंधीत अधिकाऱ्यांनी दिनांक २९ डिसेंबर, २०१७ च्या शासनाच्या पत्राचे अवलोकन करावे व सदर पत्रातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. सदर शासनाच्या पत्राची प्रत सोबत माहितीस्तव जोडण्यात येत आहे.

६. सदर परिपत्रक कंपनीच्या इन्ट्रानेटवर (RAPDRP Portal) उपलब्ध करण्यात आलेले आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

**(संदेश हाके)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक: बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२ A/१६- ब,
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक- २९ डिसेंबर, २०१७

**प्रति,**

अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
सर्व प्रशासकीय विभाग,
मंत्रालय, मुंबई.

**विषय:-** पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.२७९७/२०१५ वर दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने पदोन्नती देण्यासंदर्भात मार्गदर्शनपर सूचना.

**संदर्भ :-** १) मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.२७९७/२०१५ संदर्भात दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेला निर्णय

२) शासनाची समक्रमांकाची दिनांक १८.१०.२०१७ व २.११.२०१७ ची पत्रे.

विषयांकित प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. २७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये, दिनांक २५.५.२००४ चा शासन निर्णय रद्द करुन पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरविले आहे. तथापि, मा.उच्च न्यायालयाने आपल्या दिनांक ४.८.२०१७ च्या निर्णयास १२ आठवडयाची स्थगिती दिली असल्यामुळे संदर्भाधिन क्र. २ येथील दिनांक १८.१०.२०१७ च्या पत्रान्वये सदर स्थगिती कालावधीत पदोन्नतीमध्ये आरक्षण देऊन पदोन्नती देण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले होते. हा स्थगिती कालावधी दिनांक २७.१०.२०१७ रोजी संपुष्टात आला आहे.

२. या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या उक्त निर्णयास स्थगिती देण्याच्या अनुषंगाने, मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६ /२०१७ संदर्भात दिनांक ३०.१०.२०१७ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक ४.८.२०१७ च्या निर्णयास कोणतीही स्थगिती दिलेली नाही अथवा परिस्थिती "जैसे थे" ठेवण्याबाबत देखिल कोणतेही आदेश दिलेले नाहीत. त्यामुळे शासन निर्णय दि. २५.५.२००४ मधील तरतुदीनुसार मागासवर्गीयांना पदोन्नतीमध्ये आरक्षण देता येणार नाही. यास्तव, मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश होईपर्यंत सर्व स्तरावरील पदोन्नती प्रक्रिया स्थगित ठेवण्याबाबतच्या सुचना संदर्भाधिन दि.२.११.२०१७ च्या पत्रान्वये देण्यात आल्या होत्या.

३. सदर प्रकरणी दिनांक १५.११.२०१७ रोजी झालेल्या सुनावणीच्यावेळी मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या दि.४.८.२०१७ च्या आदेशास स्थगिती देण्याबाबत अथवा परिस्थिती जैसे थे ठेवण्याबाबत कोणतेही आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे दि.२७.१०.२०१७ पासून राज्यातील सर्व स्तरावरील पदोन्नतीची प्रक्रीया पुर्णपणे ठप्प झाली आहे. मा.उच्च न्यायालयाने पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने सर्वच स्तरावरील पदोन्नतीची प्रक्रीया स्थगित न ठेवता, खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत विविध प्रशासकीय विभाग तसेच खुल्या प्रवर्गातील अधिकारी/कर्मचा-यांकडून शासनास निवेदने प्राप्त झाली आहेत.तसेच मा.सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ अद्याप प्रलंबित आहे, ही बाब विचारात घेता, याबाबत विधि व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्यात आले. त्या विभागाने दि.२८.१२.२०१७ रोजी दिलेल्या अभिप्रायानुसार खुल्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यास कोणतीही वैधानिक अडचण नसल्याचे अभिप्राय दिले आहेत. त्यानुसार तुर्तास पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्यात यावीत.अशी कार्यवाही करतांना सेवाजेष्ठता यादीमधील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देण्यापुर्वी ते , दि.२५.५.२००४ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळून सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत, याची खात्री प्रत्येक प्रशासकीय विभागाने करावी.

४. सर्व प्रशासकीय विभागांनी उपरोक्त आदेश त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांना तातडीने निदर्शनास आणून सदर आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे.

५. सदर शासन पत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१७१२२९१४२१५२५८०७ असा आहे. हे पत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

Rasik Ambadas khadse

Digitally signed by Rasik Ambadas khadse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GAD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=46b7df2d2f9479d2bb9092a9859cf1644735a09d26dba77f04d38c1354b35457, cn=Rasik Ambadas khadse
Date: 2017.12.29 14:26:54 +05'30'

**(र.अं.खडसे)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) राज्यपाल यांचे सचिव,

२) मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव,

३) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,

४) विरोधी पक्ष नेता, विधानसभा व विधानपरिषद यांचे खाजगी सचिव